# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मलवाहिन्या व चेंबरची सफाई
**{सार्व.आ.अभि. विभाग}** करण्याकरीता 5 मध्यम स्वरुपाच्या (8000 लिटर क्षमतेच्या) सक्शन कम जेटींग रिसायकल मशीनचे संच 7 वर्षाकरीता भाडेतत्वावर घेण्याबाबत तसेच प्रथम वर्षानंतर 4 टक्के वार्षीक वाढ प्रति वर्ष देण्याचे प्रस्तावित आहे. यास्तव अंदाजे 7 वर्षाकरीता एकुण रु. 55,03,68,000/- (रु. पंचावन कोटी 3 लक्ष अडुसष्ठ हजार फक्त) रक्कमेची आवश्यक्ता असेल, सदरील काम पद क्र. A23801932617 अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब रु. 55,03,68,000/- राशीस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून निम्नतम दर प्राप्त करुन सदरील 5 संच 7 वर्षाकरीता भाडेतत्वावर घेण्याचा व या कामाचा खर्च पद क्र. A23801932617 अंतर्गत भागविण्याचा व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :

1. प्रस्तावित काम हे पद क्र. A23801932617 (सिव्हर लाईन चोकेज काढण्याकरिता लागणारी मशीन भाडेतत्वावर घेणे) अंतर्गत प्रस्तवित असुन सदर्हु कामास सन 2023-24 या आर्थिक वर्षात सदर पदा अंतर्गत प्रावधान प्राप्त आहे. प्रतिवर्षी सदरील कामाकरीता टप्प्या टप्प्याने प्रावधान नोंदविण्यात येईल.
2. सविस्तर टिप्पणी नस्तीमध्ये आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 887/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 02/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मलवाहिन्या व चेंबरची सफाई करण्याकरीता 5 मध्यम स्वरुपाच्या (8000 लिटर क्षमतेच्या) सक्शन कम जेटींग रिसायकल मशीनचे संच 7 वर्षाकरीता भाडेतत्वावर घेण्याबाबत तसेच प्रथम वर्षानंतर 4 टक्के वार्षीक वाढ प्रति वर्ष देण्याचे प्रस्तावित आहे. यास्तव अंदाजे 7 वर्षाकरीता एकुण रु. 55,03,68,000/- (रु. पंचावन कोटी 3 लक्ष अडुसष्ठ हजार फक्त) रक्कमेची आवश्यक्ता असेल, सदरील काम पद क्र. A23801932617 अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब रु. 55,03,68,000/- राशीस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून निम्नतम दर प्राप्त करुन सदरील 5 संच 7 वर्षाकरीता भाडेतत्वावर घेण्याचा व या कामाचा खर्च पद क्र. A23801932617 अंतर्गत भागविण्याचा व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.